महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ६७ वे | दिनांक : २७/०२/२०२६ | वार : शुक्रवार

# सुनेत्रा पवारांची पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड



**मुंबई** : दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. वरळी डोम येथे पक्षाच्या कार्यकारिणी बैठकीत हा निर्णय झाला असून प्रफुल्ल पटेल यांनी याबाबतची घोषणा केली.

महाराष्ट्राच्या विकासासाठी अजितदादा झटत राहिलेले आपण पाहिले आहे. त्यांच्या अचानक जाण्याने त्यांचे सगळे स्वप्न आधुरे राहिले आहेत. परंतु, "उनके सपने अधुरे नही रहेंगे, हम सब मिलकर उनके सपने और भी उंचाई पर हम सब लेके जायेंगे", असे यावेळी सुनेत्रा पवार म्हणाल्या.

सुनेत्रा पवार म्हणाल्या, आदरणीय दादा आज आपल्यात नाहीत, हे अजूनही मन मानायला तयार नाही. हा आघात प्रचंड आहे. मात्र, वास्तव मान्य करायला पाहिजे. यातून आपल्याला बाहेर पडले पाहिजे. कारण आपली राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हा केवळ पक्ष नाही, हा विचार आहे, परिवार आहे. हा विचार पुढे नेण्यासाठी आपल्याला निर्धाराने पुढे जावे लागणार आहे. मला आणि आपल्या सगळ्यांना माहित आहे की दादांची पोकळी कधीच भरून निघू शकणार नाही. पण त्यांनी दाखवलेला विकास मार्ग, त्यांची जिद्द, त्यांची शिस्त हीच खरी राष्ट्रवादी आहे.

## स्वातंत्र्यवीर सावरकरांना 'भारतरत्न' द्या : आमदार प्रसाद लाड यांची विधिमंडळात मागणी



**मुंबई** : स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून त्यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' प्रदान करण्यात यावा, अशी मागणी आज विधानपरिषदेत करण्यात आली. भाजप आमदार प्रसाद लाड यांनी उपस्थित केलेल्या या मागणीवर राज्य सरकारने सकारात्मकता दर्शवली असून, यासंदर्भातील ठराव लवकरच सभागृहात मांडण्यात येईल, असे संकेत संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत.

गेल्या १० वर्षांपासून केंद्रात आणि राज्यात सावरकरांच्या विचारांचे अनुकरण करणारे सरकार असतानाही अद्याप हा सन्मान का मिळाला नाही, असा प्रश्न विविध संघटनांकडून वारंवार उपस्थित केला जातो. तर विरोधकांनी या मुद्द्यावरून वेळोवेळी सत्ताधारी भाजपला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला आहे. या पार्श्वभूमीवर झालेली चर्चा महत्त्वाची मानली जात आहे.

आज स्वातंत्र्यवीर सावरकर यांची पुण्यतिथी असल्याने विधान परिषदेच्या सभागृहात त्यांच्या बलिदानाची आणि विचारांची आठवण करून देण्यात आली. विधानपरिषदेत बोलताना आमदार प्रसाद लाड म्हणाले की "आज स्वातंत्र्यवीर सावरकर यांची पुण्यतिथी आहे. सावरकरांच्या हिंदुत्ववादी विचारांवर चालणारे सरकार आज राज्यात आणि केंद्रात आहे. त्यामुळे त्यांना भारतरत्न मिळावा, यासाठी आपण या सभागृहात एकमताने ठराव मंजूर करून तो केंद्र सरकारकडे पाठवावा."

आमदार प्रसाद लाड यांच्या मागणीला उत्तर देताना मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सकारात्मकता दर्शवली. "आम्ही यासंदर्भातील प्रस्ताव सभापती महोदयांकडे मांडू. शासनाला असा प्रस्ताव सभागृहात आणावा लागेल आणि त्यानंतर त्यावर निर्णय घेतला जाईल," असे पाटील यांनी स्पष्ट केले. यामुळे महाराष्ट्र विधिमंडळातून सावरकरांच्या भारतरत्न पुरस्काराबाबतच्या अधिकृत कार्यवाहीला आता सुरुवात झाल्याचे मानले जात आहे.

सावरकरांना भारतरत्न पुरस्कार देण्याचा मुद्दा अनेक वर्षांपासून चर्चेत आहे. विशेष म्हणजे, २०१९ च्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनात केंद्र सरकारने स्पष्ट केले होते की, भारतरत्न पुरस्कारासाठी कोणत्याही औपचारिक शिफारसीची तांत्रिक गरज नसते. सरकार शिफारसीशिवायही हा पुरस्कार देण्यास सक्षम आहे. मात्र, जनभावना आणि विधिमंडळाचा ठराव म्हणून हा प्रस्ताव पुन्हा एकदा केंद्राच्या पटलावर मांडला जाणार आहे.

## १ मार्चपासून सिम कार्डशिवाय व्हॉट्सॲप चालणार नाही : सरकारने मुदतवाढ देण्यास नकार दिला




केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे की 'सिम बाईंडिंग'चे नियम लागू करण्याची 28 फेब्रुवारीची अंतिम मुदत वाढवली जाणार नाही. नवीन नियमांनुसार फोनमध्ये सिम कार्ड नसल्यास व्हॉट्सअॅपसारखे मेसेजिंग ॲप काम करणार नाहीत. कॉम्प्युटरवर लॉगिन केलेले व्हॉट्सअॅप देखील 6 तासांत लॉग-आउट होईल. **समजून घ्या, काय आहे नवीन नियम आणि तुमच्यावर कसा होईल परिणाम? 1. सिम बाईंडिंगचा नवीन नियम कधीपासून लागू होईल?** जेव्हा तुम्ही एखाद्या ॲपला सिम बाईंडिंगशी जोडता, तेव्हा ते ॲप तेव्हाच उघडेल जेव्हा तुमचे नोंदणीकृत सिम कार्ड त्याच फोनमध्ये असेल. हा नियम 1 मार्च 2026 पासून लागू होईल. 2. **सरकारने अंतिम मुदत वाढवण्यास नकार का दिला?** केंद्रीय संचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी सांगितले की, सध्या नियमांचे पालन करण्याची मुदत वाढवण्यावर कोणताही विचार नाही. ते म्हणाले की, हे नियम राष्ट्रीय सुरक्षा आणि फसवणूक रोखण्यासाठी लागू करण्यात आले आहेत आणि सुरक्षेच्या मुद्द्यांवर सरकार कोणतीही तडजोड करणार नाही. **३. मार्चनंतर युजर्सना काय करावे लागेल?** युजर्सना हे सुनिश्चित करावे लागेल की त्यांचे व्हॉट्सॲप ज्या नंबरवर आहे, ते सिम त्याच फोनमध्ये असावे. जर सिम कार्ड फोनमधून काढले तर मेसेजिंग ॲप काम करणे बंद करू शकते. **४. टेक कंपन्या आणि संस्थांची यावर काय भूमिका आहे?** इंडस्ट्री असोसिएशन IAMAI ने सरकारला इशारा दिला आहे की, दर ६ तासांनी लॉग-आउट करण्याचा नियम कामासाठी व्हॉट्सॲप वेबवर अवलंबून असलेल्या प्रोफेशनल्ससाठी त्रासदायक ठरेल. तसेच, एकाच अकाउंटचा वापर करणाऱ्या कुटुंबांनाही अडचणी येतील. **५. कंपन्यांनी नियम पाळले नाहीत तर काय कारवाई होईल?** केंद्र सरकारच्या आदेशानुसार, कंपन्यांना १२० दिवसांच्या आत याबाबत अहवाल सादर करावा लागेल. नियमांचे पालन न केल्यास दूरसंचार कायदा २०२३, दूरसंचार सायबर सुरक्षा नियम आणि इतर लागू कायद्यांनुसार कारवाई केली जाईल. **ज्योतिरादित्य सिंधिया यांनी इतर दोन प्रकरणांवरही माहिती दिली... १. स्टारलिंकचे लॉंचिंग** सॅटेलाइट इंटरनेट सेवा 'स्टारलिंक'बद्दल सिंधिया यांनी सांगितले की, कंपनीने अद्याप सरकारी सुरक्षा एजन्सींसमोर आवश्यक प्रात्यक्षिके पूर्ण केलेली नाहीत. कंपनीला हे दाखवावे लागेल की ती भारतीय सीमांच्या बाहेर इंटरनेट ॲक्सेस बंद करू शकते. गरज पडल्यास नेटवर्कवर नियंत्रण देऊ शकते. **२. BSNL अधिकाऱ्याचे प्रकरण** अलीकडेच BSNL संचालक विवेक बंजल यांच्या प्रयागराज दौऱ्याचा एक सरकारी आदेश व्हायरल झाला होता. त्यात त्यांच्या सेवेसाठी सुमारे ५० कर्मचाऱ्यांची व्यवस्था करण्यास सांगितले होते. सिंधिया म्हणाले की, या प्रकरणात 'कारण दाखवा' नोटीस जारी करण्यात आली आहे. २१ व्या शतकातील भारतात असा आदेश जारी होणे अजिबात मान्य नाही. आम्ही हे असेच जाऊ देणार नाही. वादाच्या दरम्यान, मंत्री सिंधिया यांनी हे देखील सांगितले की, सरकारी दूरसंचार कंपनी BSNL सध्या आर्थिकदृष्ट्या चांगली कामगिरी करत आहे आणि कंपनी "हेल्दी कॅश फ्लो" (निरोगी रोख प्रवाह) निर्माण करत आहे. **नॉलेज पार्ट: सिम बाईंडिंग काय आहे?** सिम बाईंडिंग एक सुरक्षा कवच आहे. हे तुमच्या मेसेजिंग ॲपला तुमच्या फिजिकल सिम कार्डसोबत 'लॉक' करते. याचा सर्वात मोठा फायदा हा आहे की, कोणताही हॅकर किंवा ठग तुमच्या नंबरचा वापर दुसऱ्या कोणत्याही डिव्हाइसवर बसून करू शकणार नाही.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २७ फेब्रुवारी २०२६


## बीड जिल्ह्यात “छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान” राबविणार

**बीड, (भगवंत पाळवदे) :** महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार बीड जिल्ह्यात “छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान (टप्पा क्र. १)” राबविण्यात येणार असून मंडळ, तालुका तसेच नगर परिषद/नगर पंचायत स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक व गतिमान करण्याच्या उद्देशाने हे अभियान हाती घेण्यात आले आहे. ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, महिला व विद्यार्थ्यांच्या महसुली विषयांशी संबंधित प्रलंबित प्रश्नांचे तात्काळ निराकरण शिबिरांमधून करण्यात येणार आहे.जिल्ह्यात १८ फेब्रुवारी ते ५ मार्च २०२६ या कालावधीत पूर्वतयारी करण्यात येणार आहे. त्यानंतर ७ व १४ मार्च तसेच १० व १७ एप्रिल २०२६ रोजी मंडळ स्तरावर शिबिरे घेण्यात येतील. नगर परिषद व नगर पंचायत स्तरावरील शिबिरे ८ व १५ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहेत.या अभियानांतर्गत भोगवटदार वर्ग-२ जमिनी वर्ग-१ मध्ये रूपांतर, ‘जिवंत ७/१२’ मोहिमेद्वारे नोंदी दुरुस्ती, प्रलंबित फेरफार प्रकरणांचा निपटारा, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे आदेश वितरण, ‘सर्वांसाठी घरे’ अंतर्गत पट्टे वाटप, पाणंद रस्त्यांच्या मान्यता प्रक्रिया तसेच डिजिटल (QR कोडयुक्त) ७/१२ बाबत जनजागृती करण्यात येणार आहे.याशिवाय लोकसेवा हक्क कायद्यांतर्गत सेवा वितरण, ई-मोजणी, अॅग्रीस्टॅक, पीएम किसान सेवा व जनता दरबार सुविधा शिबिरांमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. महसूल कायद्यातील कलम ४२ अन्वये अकृषिक रूपांतरण प्रक्रियेतील सुधारणा व एकवेळ अधिमूल्याच्या नव्या दरांबाबतही नागरिकांना मार्गदर्शन केले जाणार आहे.सदर अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व सर्व संबंधित विभागांना आवश्यक निर्देश देण्यात आले असून प्रत्येक शिबिरानंतर विहित नमुन्यात अहवाल सादर करण्यात येणार आहे.जिल्ह्यातील नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

## मार्कवादी शिक्षणाचे बळी पडू नका : डॉ प्रभाकर शेळके



**जालना :** येथील ज्ञानतीर्थ निवासी गुरूकुल अंबड रोड जालना येथे गुणवत्ताचा गुणगौरव व निरोप सोहळा साजरा करण्यात आला या प्रसंगी प्रमुख अतिथीं म्हणून जेष्ठ साहित्यिक कवी कथाकार नाट्यलेखक डॉ प्रभाकर शेळके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, संकट ही क्षमता आणि शक्ती पाहण्यासाठी येतात. आजचा विद्यार्थी हा मार्कवादी शिक्षणाचा बळी आहे. क्षमता आणि शक्ती हिच आपली खरी परीक्षा आहे. जेवढा शिकला तेवढा हुकला. म्हणून आपण आता गुणवान झाले पाहिजे. आपण नवनवे कौशल्य आत्मसात केले पाहिजे. कार्यक्रमाचे सभूचे माजी प्राचार्य अध्यक्ष धनंजय पाटील, उद्योजक गजानन उगले, उद्योजक चैतन्य देशमुख, नारायण भुंगज किन्होळा, डॉ निलेश मदारे, संतोष भालेकर या प्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी पालक बालक अध्यापक उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री महेंद्र कांगडे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरिवंश चिमणे. यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री राठोड सर यांनी केले.

## सिंदखेड राजा मुद्रांक विक्रेत्यांच्या कडुन होतोय सर्वसामान्य जनतेला नाहक मानसिक व आर्थिक त्रास



**सिंदखेड राजा (शेख कदीम)** : येथील खरेदी मुद्रांक विशेष कार्यकारी अधिकारी विक्रेते यांच्या कडुन स्टॅम व स्टॅप खरेदी धारक यांना स्टॅम्प तिकीटाचे दुप्पट पैसे मोजावे लागतात तर काही स्टम्प विक्रेते त्यांचे जवळ स्टॅम असुन देखिल ते काही स्टॅम्प खरेदी धारकास वाजवी पैसे मिळावे या करता सरळ स्टॅम्प नाही दुसरीकडे बघा तिथे गेल्यावरती ही परत तीच बोंब एकण्यास मिळते तिकीट नाही म्हणून सांगतात त्यामुळे स्टॅम्प खरेदी धारकास नाहक आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे तरी संबंधी वरिष्ठांनी सदर प्रकरणाची दखल घेवून सदर स्टॅम्प विक्रते तिकीट विक्रेत यांची सखोल चौकशी करून त्याच्यावर कडक कार्यवाही करून त्यांचे परवाना तात्काळ रद्द करण्यात यावा करावी अशी लेखी स्वरूपाची तक्रार गजानन कहाळे (पत्रकार) आडगाव राजा यांनी दिनांक 24 फेब्रुवारी रोजी मा. उपकोषागार अधिकारी व दुय्यम निबंधक अधिकारी साहेब सिंदखेड राजा व माननीय तहसीलदार तथा दंडाधिकारी साहेब तहसिल कार्यालय सिंदखेड राजा यांच्या कडे तक्रार केली असून या तक्रारीत बबन सरकटे, दिपक इंगळे,दिलीप साजने इ. नागरिकांच्या स्वाक्षरी आहे सदर स्टम्प विक्रते यांना संबंधीत वरीष्ठ तर पाठीशी घालत नाहीत ना अशि उलट सुलट चर्चा परीसरात दबक आवाजात आल्याच ऐकु येत आहे तरी वरिष्ठांनी या प्रकरणाकडे तात्काळ लक्ष देण्याची अत्यंत जरूरीची गरज निर्माण झाली असून नक्कीच वरिष्ठ या प्रकरणा त काय कारवाई करणार या कडे तालुक्यातील सर्वसामान्य जनतेचे लक्ष वेधले आहे.

## राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंती उत्साहात साजरी







**छत्रपती संभाजीनगर :** विवेकानंद शिक्षण संस्था संचलित मराठा हायस्कूल, चौराहा येथे थोर समाजसुधारक संत गाडगे महाराज यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री. सुहास मडके सर हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पर्यवेक्षक श्री. अशोक उगले सर आणि श्री. अंबादास वाघ सर यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी मान्यवरांनी गाडगे महाराजांच्या स्वच्छता, समाजसेवा व मानवतेच्या कार्याचा आदर्श विद्यार्थ्यांनी जीवनात अंगीकारावा, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. अरुण माने सर यांनी केले, तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री. ढवळु बहिरम सर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २७ फेब्रुवारी २०२६


## मराठी भाषा : संस्कृती आणि अस्मितेचा श्वास

२७ फेब्रुवारी हा दिवस मराठी समाजाच्या सांस्कृतिक दिनदर्शिकेत केवळ औपचारिक उत्सव म्हणून नोंदला गेलेला नाही, तर तो आपल्या भाषिक आत्मभानाचा, स्मृतिधनाचा आणि अस्मितेच्या सातत्याचा साक्षीदार आहे. मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना आपण एका अर्थाने स्वतःकडे म्हणजेच आपल्या बोलण्यात, विचारात, संवेदनांत आणि सामाजिक वर्तनात खोलवर रुजलेल्या भाषेकडे पाहतो. भाषा ही फक्त संवादाचे साधन नसते; ती समाजाची सामूहिक स्मृती असते. पिढ्यान्‌पिढ्यांचे अनुभव, श्रम, आनंद, दु:ख, संघर्ष, स्वप्ने आणि मूल्ये शब्दांच्या रूपाने भाषेत साठलेली असतात. मराठी भाषा ही महाराष्ट्राच्या भूमीशी, लोकजीवनाशी आणि इतिहासाशी घट्ट बांधलेली आहे. म्हणूनच तिचा गौरव म्हणजे आपल्या अस्तित्वाचा गौरव आहे.मराठी भाषेचा इतिहास हा हजारो वर्षांचा, अनेक टप्प्यांतून गेलेला प्रवास आहे. प्राचीन महाराष्ट्री प्राकृतपासून सुरू झालेली ही भाषा अपभ्रंशाच्या अवस्थेतून पुढे जात लोकभाषा म्हणून विकसित झाली. प्रारंभी मराठी भाषा ही सामान्य जनतेच्या दैनंदिन व्यवहाराची भाषा होती. शेतकरी, कष्टकरी, कारागीर, व्यापारी, स्त्रिया सगळ्यांच्या जीवनात ही भाषा सहजपणे मिसळलेली होती. तिच्या शब्दसंपत्तीतून लोकजीवनाचे प्रतिबिंब उमटते. म्हणी, वाक्प्रचार, लोकगीते, ओव्या, पोवाडे यांमधून मराठी भाषेने लोकसंस्कृती जपली आणि पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवली.संत परंपरेने मराठी भाषेला एक नवे वळण दिले. संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी'च्या माध्यमातून संस्कृतमधील गहन तत्त्वज्ञान मराठी भाषेतून सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवले. हा क्षण मराठी भाषेच्या इतिहासातील क्रांतिकारक टप्पा मानला जातो. ज्ञानेश्वरांनंतर नामदेव, एकनाथ, तुकाराम, समर्थ रामदास यांसारख्या संतांनी मराठी भाषेला अध्यात्मिक उंची दिली. त्यांच्या अभंगांमधून मराठी भाषा ही भक्तीची, समतेची आणि करुणेची भाषा बनली. जातीभेद, अहंकार आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध संतसाहित्याने मराठी भाषेतून मानवी मूल्यांचा संदेश दिला. त्यामुळे मराठी भाषा ही केवळ धार्मिक अभिव्यक्तीची भाषा न राहता, ती समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन बनली.मध्ययुगीन काळात मराठी भाषेने राजकीय आणि प्रशासकीय क्षेत्रातही आपले स्थान निर्माण केले. स्वराज्यनिर्मितीच्या काळात मराठी भाषेला विशेष महत्त्व प्राप्त झाले. राज्यकारभार, दप्तरी व्यवहार आणि न्यायनिवाड्यात मराठी भाषेचा वापर करून भाषिक स्वाभिमान अधोरेखित करण्यात आला. त्या काळात मराठी भाषा ही केवळ साहित्यिक किंवा धार्मिक मर्यादेत न राहता, ती सत्तेची, नीतीनिर्मितीची आणि लोककल्याणाची भाषा बनली. भाषा आणि सत्ता यांचे नाते लोकाभिमुख झाले; मराठी भाषा जनतेशी थेट संवाद साधणारी ठरली.ब्रिटिश राजवटीच्या काळात मराठी भाषेने नवजागरणाचा अनुभव घेतला. मुद्रणयंत्राच्या आगमनामुळे वृत्तपत्रे, मासिके आणि पुस्तके मोठ्या प्रमाणावर प्रकाशित होऊ लागली. समाजसुधारकांनी मराठी भाषेतून लोकांशी संवाद साधला आहे. स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, अस्पृश्यता निवारण, अंधश्रद्धा निर्मूलन यांसारख्या विषयांवर मराठी भाषेतून निर्भीड लेखन झाले आहे. मराठी भाषा ही परिवर्तनाची भाषा बनली. समाजमन ढवळून काढणारी, प्रश्न विचारणारी आणि नव्या मूल्यांची जाणीव करून देणारी भूमिका तिने बजावली. स्वातंत्र्यलढ्याच्या काळातही मराठी भाषेने जनजागृतीचे महत्त्वपूर्ण कार्य केले.स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्याने अनेक नवे प्रवाह अनुभवले. ग्रामीण साहित्याने खेड्यातील जीवन, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि ग्रामीण संस्कृतीचे वास्तव मांडले. दलित साहित्याने सामाजिक विषमतेचे कटू वास्तव उघड केले आणि वंचितांच्या आवाजाला शब्द दिले. स्त्रीवादी लेखनाने स्त्रियांच्या अनुभवांना, वेदनांना आणि संघर्षांना अभिव्यक्ती दिली. आदिवासी साहित्याने मुख्य प्रवाहाबाहेरील समाजजीवन मराठी भाषेतून मांडले. या सर्व प्रवाहांमुळे मराठी भाषा अधिक व्यापक, समावेशक आणि लोकाभिमुख बनली आहे.आज मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना वर्तमानकाळातील आव्हानेही समजून घेणे आवश्यक आहे. जागतिकीकरण, शहरीकरण आणि इंग्रजी भाषेचे वाढते प्राबल्य यामुळे मातृभाषेच्या वापरावर मर्यादा येत आहेत. अनेक कुटुंबांत मुलांशी मराठीत संवाद कमी होत आहे. सार्वजनिक फलक, जाहिराती आणि कार्यालयीन व्यवहारांमध्ये मराठी भाषेला दुय्यम स्थान दिले जात असल्याची उदाहरणे दिसतात. ही परिस्थिती मराठी भाषेच्या भविष्यासाठी चिंताजनक आहे, हे नाकारता येणार नाही.तथापि, या आव्हानांबरोबरच काही आशादायक बदलही दिसून येतात. डिजिटल युगात मराठी भाषेला नवे व्यासपीठ मिळाले आहे. सोशल मीडिया, ब्लॉग्स, पॉडकास्ट्स आणि व्हिडिओ माध्यमांद्वारे मराठी भाषेतून मोठ्या प्रमाणावर आशयनिर्मिती होत आहे. तरुण पिढी मराठी भाषेतून कविता, कथा, सामाजिक भाष्य, इतिहास, विज्ञान आणि तंत्रज्ञानविषयक लेखन करताना दिसत आहे. ही बाब मराठी भाषेच्या सर्जनशील क्षमतेचे द्योतक आहे.मराठी भाषेचा प्रवास केवळ ऐतिहासिक कालखंडांपुरता मर्यादित नसून तो सातत्याने बदलणाऱ्या समाजजीवनाशी जोडलेला आहे. मध्ययुगीन भक्तीपरंपरेनंतर मराठीने जेव्हा पेशवाई, इंग्रजी राजवट आणि नंतर स्वातंत्र्योत्तर काळ अनुभवला, तेव्हा तिच्या आशयात, अभिव्यक्तीत आणि शैलीत आमूलाग्र परिवर्तन घडत गेले. संत ज्ञानेश्वर, संत नामदेवांच्या आध्यात्मिक भाषेपासून ते महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या परिवर्तनवादी विचारांपर्यंत मराठीने समाजमन घडवण्याचे कार्य केले. ही भाषा केवळ भावनांची वाहक राहिली नाही, तर ती शोषणाविरुद्ध लढ्याचे, विवेकाचे आणि माणूसपणाच्या मूल्यांचे प्रभावी साधन ठरली.ब्रिटिश काळात इंग्रजी शिक्षणाचा प्रभाव वाढत असताना मराठी भाषेसमोर अस्तित्वाचे आव्हान उभे राहिले. परंतु या काळातच मराठीने नवे बळ मिळवले. वृत्तपत्रे, नियतकालिके, ग्रंथनिर्मिती आणि आधुनिक शिक्षणसंस्था यांच्या माध्यमातून मराठी विचारविश्व अधिक व्यापक झाले. केसरी, मराठा, ज्ञानप्रकाश, मूकनायक, समता यांसारख्या पत्रांनी केवळ राजकीय जाणीव निर्माण केली नाही, तर भाषेला आधुनिक गद्यशैली बहाल केली. लोकमान्य टिळकांचे लेखन, आगरकरांचे विवेचन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि न्यायमूर्ती रानडे यांचे समाजचिंतन या सर्वांनी मराठी गद्याला तार्किकता आणि बौद्धिक खोली दिली.स्वातंत्र्यलढ्यात मराठी भाषेने जनजागृतीचे महत्त्वाचे कार्य केले. सभा, भाषणे, घोषणा आणि लेखन यांच्या माध्यमातून सामान्य माणसाला राष्ट्रीय चळवळीशी जोडण्याचे कार्य मराठीने समर्थपणे पार पाडले. या काळात कविता, पोवाडे, कीर्तन आणि लोककला यांचा वापर करून स्वातंत्र्याचा संदेश गावोगावी पोहोचवला गेला. भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती संघर्षाची शक्ती कशी ठरू शकते, याचे हे जिवंत उदाहरण होते.स्वातंत्र्यानंतरच्या काळात मराठी भाषेच्या विकासास नवे परिमाण लाभले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत भाषेची अस्मिता केंद्रस्थानी होती. अण्णा भाऊ साठे यांचे यामध्ये महत्वपूर्ण योगदान आहे. मराठी माणसाच्या हक्कांचा, स्वाभिमानाचा आणि सांस्कृतिक अस्तित्वाचा प्रश्न या चळवळीतून उभा राहिला. याच कालखंडात साहित्य, नाटक, सिनेमा आणि पत्रकारिता या क्षेत्रांत मराठीने अभूतपूर्व प्रगती केली. ग्रामीण आणि शहरी अनुभवांचे मिश्रण मराठी साहित्यात दिसू लागले. दलित साहित्य, स्त्रीवादी लेखन, आदिवासी अनुभवकथनया सर्व प्रवाहांनी मराठीला सामाजिक वास्तवाचे व्यापक दर्शन घडवले.मराठी कवितेने या काळात विशेष उंची गाठली. कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर यांसारख्या कवींनी मराठी कवितेला आधुनिक संवेदनशीलता दिली. विशेषतः विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांनी मानवी स्वातंत्र्य, सामाजिक न्याय आणि भाषिक अभिमान यांचे जे दर्शन घडवले, ते मराठी साहित्याच्या इतिहासात मैलाचा दगड ठरले. त्यांचा जन्मदिवस २७ फेब्रुवारी मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा होतो, ही गोष्टच मराठी भाषेच्या सांस्कृतिक प्रतिष्ठेचे प्रतीक आहे.मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीनेही भाषेच्या लोकप्रियतेत मोठी भर घातली. नाटकांनी समाजातील विसंगती, नैतिक प्रश्न आणि मानवी नातेसंबंध प्रभावीपणे मांडले. संगीत नाटकांपासून प्रायोगिक रंगभूमीपर्यंत मराठीने सातत्याने नवे प्रयोग स्वीकारले. चित्रपटांमधून ग्रामीण जीवन, शहरी संघर्ष, स्त्रीचे प्रश्न, शेतकऱ्यांचे दु:ख या विषयांना व्यापक प्रेक्षकांपर्यंत नेण्याचे काम मराठीने केले.आजच्या डिजिटल युगात मराठी भाषेसमोर नवी आव्हाने आणि नव्या संधी उभ्या आहेत. इंग्रजीचे वर्चस्व, तंत्रज्ञानातील भाषिक मर्यादा आणि बाजारपेठेचा दबाव यामुळे मराठीचा वापर काही प्रमाणात कमी होत असल्याची चिंता व्यक्त केली जाते. परंतु दुसरीकडे सोशल मीडिया, ब्लॉग्स, यूट्यूब, पॉडकास्ट्स आणि डिजिटल वृत्तपत्रे यांच्या माध्यमातून मराठी नव्या पिढीपर्यंत वेगळ्या स्वरूपात पोहोचत आहे. तरुण लेखक, कवी आणि विचारवंत मराठीला समकालीन प्रश्नांशी जोडत आहेत. तंत्रज्ञानाशी जुळवून घेताना भाषेची मौलिकता कशी जपायची, हा प्रश्न आज अधिक महत्त्वाचा ठरतो.मराठी भाषा गौरव दिन हा केवळ उत्सव नसून तो आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आपण दैनंदिन व्यवहारात मराठीचा किती सन्मान करतो, शिक्षणात, प्रशासनात, न्यायव्यवस्थेत आणि तंत्रज्ञानात मराठीला किती स्थान देतो, याचा विचार करण्याची ही संधी आहे. भाषा टिकते ती केवळ कायद्याने नाही, तर लोकांच्या जगण्यातून. घराघरांत, शाळांत, कार्यालयांत आणि सार्वजनिक जीवनात मराठीचा सहज, सन्मानपूर्वक वापर झाला तरच तिचे भवितव्य उज्ज्वल राहील.मराठी ही केवळ भूतकाळाची आठवण नाही; ती वर्तमानाची गरज आणि भविष्याची आशा आहे. तिच्यातील लोकशाही मूल्ये, समतेची भावना आणि मानवी करुणा आजच्या ताणतणावाच्या काळात अधिक आवश्यक आहेत. म्हणूनच मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आपण केवळ अभिमान व्यक्त न करता मराठी भाषेचे संवर्धन, समृद्धी आणि सर्जनशील विस्तार करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. मराठी भाषा जिवंत राहील ती आपल्या विचारांत, कृतीत आणि पुढच्या पिढीला दिलेल्या संस्कारांतून.




**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, मराठी आणि समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),
bagate.rajendra5@gmail.com


## जोंधळा

वरुनाचं उपकार.
समाधानी पावसाळा.
बापाच्या फ़डामंदी
असा झुलतो जोंधळा . . . .

पोटरा उसवला.
तिथं पाखरांचं येणं जाणं.
चोची चिंबिती पाखरे
जोंधळ्याचे दुध दानं. . . . . .

जोंधळ्याला पाणी देता.
चिखलात जाई तोल.
भेगाळलेल्या टाचेमंदी
बिबव्याचं लावी तेल.. . . .

जसी कनसं चिकाळती.
आगठीचा निघे धूरं .
हुरडा खाण्यासाठी
सुटे जिभिला पाझरं . . . .

भेडी कनसं फ़डामंदी.
भल्लरीला आला सुर.
बाप्पाचा आनंदाने
भरून आला ऊरं. . . . .

झाली मळणी कणसांची.
घरं पोत्यांनी भरू आलं.
माऊलीच्या चेहर्यावर.
आनंद ओसांडलं . . . .

**भूमिपुत्र वाघ**


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103

जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-

२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-

३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-

४. शुभेच्छा जाहिरात ६००/-

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २७ फेब्रुवारी २०२६


## गुजरात येथील राष्ट्रीय एकात्मता शिबिरात कन्नड येथील विद्यार्थिनीचा सहभाग



**कन्नड (अरुण थोरात) :** शिवाजी महाविद्यालय कन्नड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक कु. कल्याणी सोनवणे यांनी अहमदाबाद विद्यापीठ, अहमदाबाद येथील "राष्ट्रीय एकात्मता शिबिर" यामध्ये यशस्वी सहभाग घेतला. सदरील शिबिर हे गुजरात येथील अहमदाबाद विद्यापीठ अहमदाबाद येथे दि.०४ ते १० फेब्रुवारी २०२६ या दरम्यान आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकूण दहा राज्यातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये आपापल्या राज्यातील संस्कृतिची ओळख, देवाणघेवाण व विविधतेतून आपली एकात्मता कशी आहे याची माहिती विद्यार्थ्यांना होते यातील सर्व उपक्रमात कु. कल्याणी सोनवणे यांनी उस्फुर्त सहभाग घेतला या त्यांच्या यशा बद्दल प्राचार्य डॉ. विजय भोसले उपप्राचार्य डॉ.भाऊसाहेब मगर कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रकाश महाजन, डॉ. राकेश अहिरराव, डॉ. सीमा काशीद, डॉ सोमेश मोगरे डॉ. संतोष देशमुख प्रा. प्रगती चव्हाण, प्रा मदन खुर्दे, प्रा नागे, प्रेम दाबके, स्वार्थीक मोरे, ऋषी निकम, चंद्रशेखर देशमुख व स्वयंसेवक विद्यार्थी यांनी तिचे अभिनंदन केले


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


## भावना

एक झुळूक वाऱ्याची
खिडकीशी येऊन थांबली
खिडकी उघडीच पण...
भावना बंद आहेत
कळीच्या एका
उमलल्या पाकळ्या
पण मुकीच जणू कारण...
भावना बंद आहेत
दवबिंदू विना
रितीच पाने सारी
म्हटलं ना...
भावना बंद आहेत
क्षणाक्षणातून ओघळले
श्वासांचे मोती
पुन्हा... इथे..
भावना बंद आहेत.



**सौ. शितल सराफ**


इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com
साहिल
कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स
◆ डी.टी.पी.जॉब वर्क
◆ मराठी, हिंदी, इंग्रजी
◆ एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
◆ स्पायरल / हार्ड बाईन्डींग
◆ लॅमिनेशन
◆ कलर प्रिंट
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.


# चारित्र्य संपन्न शिक्षकाची निवृत्ती



**ज्ञा**नदान हे सर्वात पवित्र कार्य मानले जाते. या ज्ञानसेवेचे अखंड व्रत जपणारे, भौतिकशास्त्र विषयाचे आदरणीय शिक्षक श्री. जितेंद्र लक्ष्मण बोडखे सर आज ३२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्तीच्या उंबरठ्यावर उभे आहेत. हा क्षण आनंदाचा असला तरी भावनांनी ओथंबलेलाही आहे.सरांनी आपल्या अध्यापनातून केवळ सूत्रे आणि सिद्धांत शिकवले नाहीत, तर विज्ञानाकडे पाहण्याची दृष्टी दिली. त्यांच्या साध्या, सोप्या आणि विद्यार्थ्याभिमुख शिकवण्याच्या पद्धतीमुळे भौतिकशास्त्रासारखा कठीण विषयही विद्यार्थ्यांना आवडू लागला. प्रयोगशीलता, शिस्त, वेळेचे महत्त्व आणि जिज्ञासा या गुणांची रुजवण त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनात केली.“शिक्षकाचे बाह्य सौंदर्य कसे असावे, याचे उत्तम उदाहरण म्हणजे जितेंद्र बोडके सर होय. साधेपणा, नीटनेटकेपणा आणि प्रसन्न व्यक्तिमत्त्व ही त्यांच्या बाह्य रूपाची ओळख होती. स्वच्छ वेशभूषा, आत्मविश्वासपूर्ण देहबोली आणि विद्यार्थ्यांशी बोलताना दिसणारा आपुलकीचा भाव यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व सर्वांना भावत असे. त्यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना आदर, विश्वास आणि प्रेरणा मिळत असे. म्हणूनच त्यांचे बाह्य सौंदर्य हे केवळ रूपापुरते मर्यादित नसून, ते त्यांच्या स्वभावातील सुसंस्कृततेचे आणि शिक्षकधर्मातील प्रामाणिकतेचे प्रतिबिंब होते.”बोडखे सरांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत शांत, संयमी आणि प्रेरणादायी आहे. प्रत्येक विद्यार्थ्याकडे त्यांनी आपल्या मुलाप्रमाणे पाहिले. अडचणीत असलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, त्यांना आत्मविश्वास देणे आणि यशाच्या वाटेवर नेणे हे त्यांच्या जीवनाचे ध्येय होते. अनेक विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनातून उज्ज्वल भविष्य घडवले, हीच त्यांच्या कार्याची खरी पावती आहे.संस्थेच्या विकासातही सरांचा मोलाचा वाटा राहिला. प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि कार्यतत्परता यांचे उत्तम उदाहरण म्हणजे बोडखे सर. त्यांच्या कार्यामुळे संस्थेची शैक्षणिक परंपरा अधिक समृद्ध झाली. सरांच्या कार्याचा आलेख पाहताना त्यांनी केलेले अथक परिश्रम, त्याग आणि ज्ञानदानाच्या पवित्र कार्यात दिलेले योगदान स्पष्टपणे दिसते प्रा. जितेंद्र बोडखे यांनी विद्यार्थी घडवण्याच्या प्रक्रियेत, मार्गदर्शन करण्याच्या त्यांच्या कार्यक्षमतेमुळे अनेक विद्यार्थ्यांच्या जीवनाला नवी दिशा मिळाली आहे. एक शिक्षक म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांना फक्त पुस्तकातील ज्ञानच दिले नाही तर त्यांच्यामध्ये विचारशीलता, सृजनशीलता आणि मानवता यांचे बिजारोपण केले आहे.महाविद्यालयातील प्रत्येक उपक्रमात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. यामध्ये JEE NEET CELL चे प्रवेश प्रक्रियेत शाळा भेटी चे समिती प्रमुख म्हणून त्यांच्या मार्गदर्शनाखाली 122 शाळांना भेटी व 2500 विद्यार्थी संपर्क केलेला आहे. मुलांच्या वस्तीगृह समितीचे 8 वर्ष सदस्य,स्वच्छता समिती असो वा बांधकाम समिती, महाविद्यालयाची Maintance समिती,JEE NEET CELL मधील Doubt Session असो, सगळी कामे अतिशय चोखपणे केलेली आहेत. JEE NEET CELL चे काम करून नियमित तासिका घेणारे एकमेव शिक्षक आहेत केवळ शिक्षक म्हणून नव्हे तर मार्गदर्शक, सल्लागार आणि प्रेरणास्थान म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांना घडवले. अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत यशस्वी झाले असून त्यामागे सरांचे संस्कार आणि मार्गदर्शन आहे, हीच त्यांच्या कार्याची खरी पावती आहे.निवृत्ती हा शेवट नसून नव्या प्रवासाची सुरुवात असते. आज औपचारिक सेवेतून ते निवृत्त होत असले तरी त्यांनी दिलेले ज्ञान, मूल्ये आणि प्रेरणा कायम आमच्या सोबत राहतील. त्यांच्या कार्याचा ठसा आमच्या मनावर सदैव उमटलेला राहील. आज त्यांचा गौरव करताना आम्हाला मनस्वी आनंद आणि अभिमान वाटतो.कामात राम आहे आणि सर्वांनी खूप शिकले पाहिजे असे सांगून सामान्यांच्या शिक्षणासाठी व आरोग्यासाठी आपली संपूर्ण हयात या दोन मूलभूत सुविधांसाठी व्यतीत करणारा प्राध्यापक म्हणून जितेंद्र बोडखे सरांची ओळख आहे.शिवरायांचा आठवावा साक्षेप' म्हणजे शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेसाठी केलेला प्रयत्न, जिद्द, कष्टाळू वृत्ती आणि सूक्ष्म नियोजनाचे स्मरण करणे होय.अशी ध्येयवादी माणसं खूप कमी असतात ते शोधूनही सापडत नाहीत त्यांच्यासाठी त्यांचा गौरव सोहळा कार्यकृती आदरभाव असतो. माझा एक उत्तम कुशल शिक्षक मार्गदर्शक मित्र प्राध्यापक जितेंद्र बोडके यांचा निरोप समारंभ कार्यक्रम होत आहे ही बाब निश्चितच आपल्या सर्वांच्यासाठी आनंददायी आहे. आपले शैक्षणिक कामकाज करताना त्यांनी वेळेचे बंधन कधीच पाळले नाही. घड्याळाकडे कधीच लक्ष दिले नाही , त्यांचे कार्य अत्यंत कौतुकास्पद आहे सरस्वतीच्या मंदिराकडे वाटचाल करणारा प्रवासी विद्यार्थी हे दैवत म्हणून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ध्यास घेतलेला एक ध्येयवेढा शिक्षक आणि स्नेह मार्गाने स्नेह जोडी, स्नेह वाटत फिरणारे प्रेमळ स्नेही ही त्यांची ओळख आहे . त्यामुळे या कुटुंब वत्सल स्नेह मार्गी शिक्षकाचे जीवन एक यशोगाथा बनली आहे ती त्यांच्या सुविधे पत्नी आमच्या वहिनीमुळे व त्यांच्या जोड सहकार्यामुळे हे कुटुंब आज संपन्न समाधानी व समृद्ध बनलेले आहे या त्यांच्या दोन्ही मुलांचा सिंहाचा वाटा आहे.मित्रत्वाचं नातं निर्माण करणे व ते टिकविणे हा बोडके सरांचा स्वभाव आहे त्यासाठी मन अत्यंत सर्जनशील व सुसंस्कृत असावे लागते. ते त्यांच्याकडे आहे प्रत्यक्ष भेटीच्या वेळी बऱ्याच वेळा एकमेकांच्या कौटुंबिक बाबतीतही चर्चा व्हायची.सरांच्या सहवासात सकारात्मक दृष्टिकोन, प्रामाणिकपणा ,चारित्र्याचा सदैव आदर्श आम्हाला मिळाला. सरांची सर्वांशीच वागणूक आपुलकीची ,जिव्हाळ्याची तसेच ममतेची आहे त्यामुळे सर सर्वांच्या मनात कायम राहतील कारण सरांनी आयुष्यभर ज्या तत्त्वाने काम केले, करीत राहिले तसेच त्यांनी शिक्षकी पेशाला व्यावसायिकतेचे स्वरूप दिले नाही.आयुष्यात पद तात्पुरते असते; प्रतिष्ठा टिकाऊ असते; आणि चारित्र्य शाश्वत असते.त्याचे अनुसरण सहकारी व विद्यार्थी करतील अशी अपेक्षा बाळगतो.बोडखे सरांमध्ये वाखाण्यासारखे अनेक गुण आहेत माणसे जोडणे हा सरांचा छंद आहे अत्यंत शिस्तप्रिय , मितभाषी पण अत्यंत मृदू आणि गोडवाणी, समाजनिष्ठा, कार्य तत्परता, कोणालाही न दुखावता प्रेमाने काम करून घेण्याची हातोटी, समोरच्या व्यक्तीचा योग्य आदर, कामाचा प्रचंड आवाका, संघटन कौशल्य, शांत स्वभाव, कुशल नेतृत्व, दूरदृष्टी आणि अचूक निर्णय क्षमता . सर अजातशत्रू आहेत. त्यामुळे सरांचा मोजकाच पण कायमस्वरूपी मित्रपरिवार आजही पहावयास मिळतो. विद्यार्थ्यांची आस्थेवाईकपणे चौकशी करून त्यांच्या अडचणी जाणून घेऊन त्या सोडवण्याला सरांनी प्राधान्य दिले एवढेच नाही तर गरजू, गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना वेळोवेळी भरीव आणि आर्थिक मदत, कोणतीही अपेक्षा न ठेवता केलेली आहे व अजूनही करत आहेत.अशा समर्पित आणि मानवतावादी शिक्षकाचा समाजाला अभिमान आहे. यांचे कार्य इतर शिक्षकांसाठी प्रेरणादायी असून, शिक्षण क्षेत्रात मानवी मूल्यांचे महत्त्व अधोरेखित करणारे आहे.यांच्या मते आत्मपरीक्षण, सहानुभूती आणि नम्रता यांमुळेच प्रतिष्ठा टिकून राहते.आज निरोप देताना मन कृतज्ञतेने भरून आले आहे. सरांचा सहवास, मार्गदर्शन आणि प्रेमळ वागणूक आम्हाला सदैव आठवत राहील. कारण आता असे शिक्षक होणे नाही. निवृत्तीनंतरचे आयुष्य आनंदी, निरोगी आणि समाधानाने भरलेले जावो, हीच मनःपूर्वक शुभेच्छा.सर, आपण दिलेले ज्ञान आणि संस्कार आमच्या आयुष्याचा दीपस्तंभ राहतील. आपल्या पुढील जीवनप्रवासासाठी हार्दिक शुभेच्छा!


**डॉ. बाळासाहेब शिंदे**
आदर्श शिक्षक महाराष्ट्र शासन
देवगिरी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर 8080239092

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २७ फेब्रुवारी २०२६


## टेरेसवरील कविता समूह म्हणजे साहित्य, संगीत, कला यांची साहित्य पंढरी - सुहास महाजन



**आ**पल्या साहित्याला व्यक्त होता येणं, आपल्यातील गुणांना साहित्यिक प्रेमींनी अलवार गोंजारणं,जिथे शब्द आणि सादरीकरणाची सांगड जमते त्या दिंडीमध्ये कवितेची पताका फडकवतटेरेसवरील कवितेची मैफल वारी हळू हळू पाऊले टाकत काव्यपंढरी कधी होत जाते तेच समजत नाही. गिरीश जोशी आणि सौ कस्तुरी जोशी या दाम्पत्याने जमवलेली ही साहित्यिक वारकरी मंडळी आज बाल साहित्यिका पासूनवयोवृद्धा पर्यतशेकडो साहित्यिकांच्या सादरीकरणाने मायेच्या उबदार शालीत व्यासपीठ उपलब्ध करून देत हजारो रसिकांना काव्यतृप्तीचा, गजलेचा, संगीताचा आनंद देते. २०१८ साली कोजागिरी पौर्णिमेला गिरीश जोशी कस्तुरी जोशी यानी आपल्या टेरेसवर सुरू केलेली ही काव्य चळवळ आज हजारो रसिकांना आणि शेकडो कवी, गजलकार, गायक, संगीतकार यांच्यासाठी भुषनावाह ठरत आहे.दर महिन्याला एक कवी संमेलन तर होतेच त्या सोबत अनेक दिग्गज संस्था देखील येथील कवी गजलकार यांना बोलावून शब्दांनी तृप्त होतात. त्यामध्ये बज्म-ए-बशर नवाज,ब्रह्मकमळ,साहित्य संगीत कला,जीवन विकास ग्रंथालय,इ मान्यवर आहेततर विविध उपक्रमातगजल नवाज भीमराव पांचाळे यांच्या सोबत गजल संवाद,कुणाचे वाढदिवस, कुणाचे पुण्यतिथी निमित्यआई वरच्या कविता असे उपक्रम सातत्याने सुरू असतात.कवींनी कवींसाठी सुरू केलेली चळवळ अनेक साहित्यिक मित्रांच्या सहकार्याने आपली दिंडी घेऊन पुढे जात आहे. त्यामध्ये शताब्दी काव्य मंडळ, आम्ही सिद्ध लेखिका,प्रकाशन असो वा साहित्यिकाला मिळालेला पुरस्कार यांसाठी त्यांचे घरच्या मंडळींनी केलेले कौतुक ही मोठी व श्रेष्ठ गोष्ट. टेरेसवसरील कवी जेंव्हा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, अनेक मुशायरे, कवी संमेलने इथे पोहोचतो तेंव्हा त्यांच्यातील प्रतिभेला मिळालेला सन्मान हीच आमची सर्वांची पावती असते. इतकेच नाही तर दिवाळी निमित्त एक दिवा कवितेचा, जागतिक मातृभाषा दिन, जागतिक कविता दिनमराठी भाषा गौरव दिनआम्ही सर्व साहित्यिक मित्र साजरी करतो.छत्रपती सभाजीनगरच नव्हे तर नांदेड, परभणी, गंगाखेड, उस्मानाबाद येथील साहित्यिक मंडळी सुद्धा आवर्जून उपस्थित असतात. अनेक दिग्गज, अनेक मान्यवर टेरेसवर बसून वैचारिक वारीचा साहित्यानंद घेतात हे आमच्या साहित्य पंढरीचे वैशिष्ट्य. लिहिण्या सोबतच मदतीसाठी लागणारा तत्पर हात या साहित्यिक मंडळींनी उजवा करून ठेवला आहे हे ही नमूद करणे गरजेचे.

**सुहास महाजन**

छत्रपती संभाजीनगर ९३२५२११२३५

## माझ्या मराठीची गोडी

माझ्या मराठीची प्रीती,आहे प्रत्येकाच्या घरी.
सुख दु:खात नांदते,तुझ्या माझ्या ओठावरी.

साधू संतांची ही भाषा,जपतात घरोघरी.
माझ्या मराठीची गोडी,राज्य करे मनावरी.

भाषा माझी ही मराठी,आहे किती बघा गोड.
नाही भेटणार त्याला,कुठे जगामध्ये तोड.

कधी हसवी रडवी,आहे महिमा निराळी.
प्रत्येकास देते बघा,सदा प्रेमाने आरोळी.

छंद लावते मराठी,इथे आलेल्या जनाला.
साद घाली बघा रोज,जपणाऱ्या रे मनाला.

साधू संतांनी रचले,अभंगात तत्त्वज्ञान.
संत ज्ञानेश्वर माझा,सांगितले गीताज्ञान.

शाहीरांच्या रचनेत,आले पोवाडे लावणी.
पोवाड्यात वीररस,संचारते क्षणोक्षणी.

पचवूनी आक्रमण,सदा आबाद राहिली.
भाषा प्रत्येकाची तिने,पचवून हो पाहिली.

आले गेले आक्रमण,करण्यास बरबाद.
नित्य संघर्ष करून,आहे मराठी नाबाद.



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# कविता माझी, मी कवितेचा

**त**से तर कविता आणि मी, आमची बालपणा पासूनची मैत्री. बाल वयात भजनाची आवड, गायची आवड. त्यातून एखादी चाल आवडली तर त्या नुसार एखादे गीत तयार करणे, त्याला चाल लावून गाणे. या छंदातच कवितेचा उदय असावा. मात्र साधारणतः ऐंशीच्या दशकात शिक्षण घ्यायच्या निमित्ताने औरंगाबाद शहरात येणे झाले. महाविद्यालयीन शिक्षण सुरू झाले. वाचनाची तर आवड होतीच. कॉलेज ग्रंथालयात तास न तास बसून मिळेल ते साहित्य लेख, कथा, कादंबऱ्या, काव्यसंग्रह वाचण्याचा झपाटा सुरू झाला. आणि त्यातूनच मन संवेदनशील बनत गेलं. मन हळहळू लागलं, कळवळू लागलं, कधी कधी तळमळूही लागलं. माझ्या मते खऱ्या अर्थानं तोच काळ माझ्यात खऱ्या कवितेचा उदय व्हायचा असावा. तरुण वय, तारुण्य सुलभ प्रेम भावना, त्याला अनुसरून वाचन आणि कॉलेज मध्ये भेटलेल्या मुली. यातून अचानक काही शब्द आतून धडपडत बाहेर येऊ लागले, कवितेचा आकार घेऊ लागले. हळूहळू माझी कविता जन्मास यायला लागली. साहजिकच प्रेम कविता तयार व्हायला लागल्या. प्रेम बाजार, नार कुणब्याची, अशा कविता त्याच काळात तयार झाल्यात. मात्र त्याचवेळेस हुंडा, नोकरीसाठी वशिला, माणसाचे विचित्र वागणे इ. गोष्टी मनावर आघात करत होत्या. करिअरची चिंता होतीच. नोकरी मिळेल की नाही? मिळाली तर कशी मिळेल? इ. विचार मनात येत होते. नोकरीसाठीची कठीण परिस्थिती डोळ्यापुढे होती. सामाजिक विषमता दिसत होती, गरीब श्रीमंत, लहान मोठा, असे भेद दिसू लागले, जाणवू लागले. त्यातूनच कविता हळूहळू कधी गंभीर बनत गेली ते कळलंच नाही.हुंडा जीवाचा काळ, सूर्याशी प्रार्थना, तोडा आणि जोडा, बेकाराची कहाणी, अतिवर्षण, बिच्चारा चोर, अशी तिची वाटचाल सुरू झाली. अधून मधून ती कोण?, प्रतिक्षा, अशा थोड्या विनोदी ढंगाच्या कविताही येऊ लागल्या. शिक्षण संपल्यावर नोकरी, संसार, वाढती जबाबदारी यामुळे कवितेकडे दुर्लक्ष होऊ लागलं. तरीही ती मात्र स्वस्थ बसू देत नव्हती. अधून मधून डोकवायचीच. मग नाईलाजाने का होईना वही पेन हातात घेऊन बसावच लागायचं. कविता कुठे तरी दैनिकात, मासिकात देणे सुरू झालं. कधी छापून यायची, कधी साभार परत यायची, तर कधी कधी तिकडेच गहाळही होऊ लागली. त्यातूनच मग मी तिचा नाद सोडायचं ठरवलं. मी जरी तिला सोडू पहात होतो, ती मात्र मला सोडायला तयार नव्हती. काही काळ वाट पाहून ती पुन्हा माझ्या वाटेला आलीच. तेव्हापासून मात्र ती चांगलीच चिकटलीय मला. आता मात्र ती मला आणि मी तिला सोडून राहूच शकणार नाही असे माझे अंतर्मन मला सांगते आहे असे वाटते. आता ती कधी वेदनेला गोंजारते, तर कधी कधी सुखाची स्वप्नेही दाखवते. कधी शेतात जाऊन येते, तर कधी बालमित्रांसोबत खेळायलाही तयार होते. कधी जीवनाच्या गंभीर विषयात घुसते, तर कधी हळुवारपणे मनाला प्रेयसीच्या दारात नेऊन उभं करते. कधी भ्रूणहत्या, बालविवाह, हुंडाबळी, वृद्धाश्रम, यासारख्या विषयावर आक्रंदून रडते सुद्धा, तर कधी श्रावणधारा, सृष्टीचे सौंदर्य, निसर्ग सौंदर्य, पाहून नाचत सुटते. कधी ती स्पर्धेसारख्या अवघड विश्वात घुसते, अडखळते सुद्धा, तर कधी कधी अलगद पणे एखादे प्रमाणपत्र घेऊन नाचत माझ्याकडे येते, माझ्या मनाला नाचायला लावते. अशी ही कविता माझ्या कुटुंबियांना मात्र त्रास देत नाही कधी. कदाचित थोडाफार त्रास त्यांना होतही असला तरी ती लडिवाळपणे त्यांना खुश करत असावी. किंवा त्यांच्या भावविश्वात शिरून साखरपेरणी करणाऱ्या गोड शब्दांनी हळुवारपणे, त्यांच्या भावनांना हात घालत, 'माझी अर्धांगिनी' सारखी आंजारत गोंजारत त्यांना शांत करत असावी असं वाटतं. अशी माझी कविता परिपूर्ण आहे की नाही? तंत्रशुद्ध आहे की नाही? अलंकृत आहे की नाही? सुंदर आहे की नाही? हे प्रश्न मनाला कधीच पडत नाही. ती जशी आहे, तशीच मला आवडते. माझ्या जीवाला भुरळ घालते, माझ्या आयुष्यात दु:खातून सावरण्याची शक्ती देते, सुखात संयम शिकवते. आणि सांगते, येतांना रिकामा आलास, जातांना रिकामा जाणार आहेस। विचार कर माझ्या मना सोबत काय नेणार आहेस? किंवा कधी सांगते, सुख दु:खाचे येणे जाणे हे तर आपले जीवन गाणे

**पंडित वराडे**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २७ फेब्रुवारी २०२६


## पिशोरच्या ऋषिकेश उखर्डे यांची यूपीएससी परिक्षेत दमदार कामगिरी



**कन्नड (अरुण थोरात) :** पिशोर (ता. कन्नड): पिशोर ता.कन्नड येथील ऋषिकेश तुकाराम उखर्डे यांनी लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या ESIC नर्सिंग ऑफिसर परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत अखिल भारतीय स्तरावर १४१५ वा क्रमांक मिळवला आहे.देशभरातून सुमारे तीन लाख उमेदवारांनी या स्पर्धा परीक्षेसाठी अर्ज केला होता. त्यापैकी केवळ ३२०० उमेदवारांची पुढील टप्प्यासाठी निवड झाली आणि अंतिम गुणवत्ता यादीत १९०० उमेदवारांची निवड करण्यात आली. या अत्यंत कठीण व स्पर्धात्मक प्रक्रियेत ऋषिकेश तुकाराम उखर्डे यांनी यश मिळवून आपल्या कुटुंबासह परिसराचे नाव उज्ज्वल केले आहे.ऋषिकेश उखर्डे हा महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पिशोर (ता. कन्नड) या शाळेचा माजी विद्यार्थी आहे. ग्रामीण भागातील शैक्षणिक पायाभूत सुविधांमध्ये शिक्षण घेत असतानाही त्याने मोठी स्वप्ने पाहिली आणि ती साकार करण्यासाठी सातत्यपूर्ण परिश्रम घेतले. सध्या त्यांची भारत सरकार अंतर्गत ग्रुप बी (क्लास II) नर्सिंग ऑफिसर म्हणून नियुक्ती झाली असून हैदराबाद येथील ESIC मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटल, सनतनगर येथे ते रुजू झाले आहे.अतिशय विपरीत परिस्थितीत कठोर परिश्रम, योग्य नियोजन आणि चिकाटी यांच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते, हे त्याने आपल्या यशातून सिद्ध केले आहे. त्याच्या या यशामागे कुटुंबीयांचे पाठबळ, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि विशेष म्हणजे स्वत:ची दुर्दम्य इच्छाशक्ती आणि चिवट जिद्द यांचा मोठा वाटा आहे. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्याचे यश प्रेरणादायी ठरणारे आहे. त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## आंबेडकरवादी संघर्ष समितीची शनिवारी बैठक

**छत्रपती संभाजीनगर :** चलो बुध्द की ओर धम्मदीक्षा अभियानांतर्गत बौद्ध, मातंग, चर्मकार समाजामध्ये भाईचारा निर्माण करणेसाठी आंबेडकर-वादी संघर्ष समितीच्या वतीने आंबेडकर-वादी मातंग, चर्मकार परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे, सदरील कार्यक्रमाच्या नियोजनासाठी दिनांक २८/०२/२६ रोजी दुपारी दीड वाजता सुभेदारी विश्रामगृह येथे महत्वपूर्ण बैठक आयोजित केली आहे, बैठकीस समितीचे अध्यक्ष श्रावणदादा गायकवाड हे मार्गदर्शन करणार आहे. तरी सदरील बैठकीस समितीचे व आंबेडकरवादी पक्ष संघटनेतील पदाधिकारी कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संजय जाटवे, विनोद कासारे, बाळु मगरे, रामेश्वर ऊदे, राहुल शिंदे,सुरज पाखरे यांनी केले आहे.

## जमाते इस्लामी हिंद कडून जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा ढोरेगावला मौल्यवान पुस्तकांची भेट!



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परिषद शाळेत/समाजात वाचन संस्कृती अधिकाधिक रुजावी,पुस्तक वाचनाच्या परंपरा निर्माण व्हाव्यात.या भावनेतून वाचन संस्कृतीचे कार्य करणाऱ्या छत्रपती संभाजीनगर येथील जमाते इस्लामी हिंद कडून जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा ढोरेगावला अवांतर वाचनाची पुस्तके भेट दिली.विशेष म्हणजे पुस्तकांची ही भेट देऊन पुस्तक व वाचन संस्कृतीला प्राधान्य द्यावे हा संदेश त्यांनी जाणीवपूर्वक या कृतीतून दिला. समाज ज्ञानवान झाला पाहिजे.बुद्धिजीवी घडले पाहिजे.त्यासाठी वाचन गरजेचे आहे.गावाच्या विकासाचा मार्ग शाळेतून जातो.शिक्षणाचा मार्ग वाचनातून जातो.त्यासाठी विद्यार्थ्यांनी खुप पुस्तके वाचावीत. त्यांना वाचनासाठी विविध पुस्तके उपलब्ध व्हावीत या प्रगल्भ हेतूने जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा ढोरेगावच्या विद्यार्थ्यांना वाचनासाठी पुस्तके उपलब्ध करून दिली. छत्रपती संभाजीनगरच्या जमाते इस्लामी हिंदचे अध्यक्ष सलमान सिद्धिकी, वाजेद कादरी,वसीमोद्दिन नेहरी यांनी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मौल्यवान पुस्तकांची भेट देत शिक्षण-सेवेचा प्रशंसनीय आदर्श ठेवला आहे.या पुस्तकांमध्ये महत्त्वपूर्ण साहित्याचा समावेश असून विद्यार्थ्यांच्या वाचनसंपदेचे दालन अधिक समृद्ध झाले आहे.शाळा परिवाराने हा उपक्रम मनापासून कौतुकाने स्वीकारला असून "ज्ञानदान हेच श्रेष्ठ दान" या भावनेला उजाळा देणारा हा स्तुत्य प्रयत्न सर्वांच्या हृदयाला भिडणारा आहे.ज्ञानदानाची प्रेरणा आणि सामाजिक बांधिलकी यांचे सुंदर मिश्रण असलेल्या या उपक्रमाचे परिसरात विशेष कौतुक होत आहे. या उपक्रमाअंतर्गत विविध पुस्तके शाळेला हस्तांतरित करण्यात आली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार वाचनसामुग्रीची उपलब्धता व्हावी, वाचनाची आवड वाढावी आणि त्यातून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाला चालना मिळावी, या हेतूने हा पुस्तकदान उपक्रम राबवण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग आणि पालकांनी या समाजहितैषी कृतीचे मन:पूर्वक स्वागत केले. त्यांनी सांगितले की, "ग्रामीण भागातील शाळांना वाचनालयासाठी संसाधनांची तुटवडा भासतो. अशा प्रकारच्या पुस्तकदान उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमधील ज्ञानलालसा वाढीस लागेल." विद्यार्थ्यांनीही आनंद व्यक्त करत या पुस्तकांचा मनापासून अभ्यास करण्याचे आश्वासन दिले.हा उपक्रम सामाजिक एकात्मता, बांधिलकी आणि शिक्षणाप्रती असलेली नितांत जाणीव अधोरेखित करणारा आहे.या दानाने केवळ पुस्तकांचे वजन वाढले नाही, तर ढोरेगावच्या मुलांच्या स्वप्नांना नवे पंख लाभले अशी प्रतिक्रिया अनेकांनी दिली. "विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी दिलीप स्वामी यांच्या पुढाकारातून राबविण्यात येत असलेल्या 'बुक बँक' उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद मिळत असून अभियानाला अधिक बळकटी प्राप्त होऊन ज्ञानवाटपाची चळवळ अधिक सक्षमपणे पुढे जात आहे. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी,मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण, गटशिक्षणाधिकारी अरविंद कापसे, केंद्रप्रमुख दत्तात्रय दाणेकर,सरपंच रजियाबी अयुब पटेल, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष खलील पटेल यांनी दानशुरांचे आणि ढोरेगाव शाळेस लाभत असलेल्या लोकसहभागाबद्दल शिक्षकांच्या स्तुत्य प्रयत्नांसाठी कौतुक केले आहे. केंद्रीय मुख्याध्यापिका अंजली पुऱ्हे,पदवीधर शिक्षक राजेश हिवाळे,मनोज घुले,शंकर राऊत, बसवराज उदे,दिलीप धर्माधिकारी, भाऊसाहेब गाढवे, मनोज मस्के,नीलिमा कुलकर्णी, मुग्धा निमसे,परमेश्वर मस्के,सचिन पाटसकर,शामीर शेख,अली बाकोदा,कल्याणी जगताप यांच्यासह विद्यार्थ्यांनी दात्यांचे आभार मानले आहेत. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा ढोरेगावच्या विद्यार्थ्यांसाठी जमाते इस्लामी हिंदचे अध्यक्ष सलमान सिद्धिकी,वाजेद कादरी,वसीमोद्दिन नेहरी यांनी मौल्यवान पुस्तकांचे योगदान दिले.त्याचा छत्रपती संभाजीनगर येथे स्वीकार करताना शिक्षक राजेश हिवाळे.





दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २७ फेब्रुवारी २०२६

# मराठी भाषेच्या विकासात संतपरंपरेचे योगदान

**म**राठी भाषा ही लोकजीवनाशी घट्ट जोडलेली, समृद्ध आणि अभिव्यक्तीक्षम भाषा आहे. तिच्या विकासात अनेक घटकांचा सहभाग असला तरी संतपरंपरेचे योगदान अत्यंत मूलभूत व क्रांतिकारी मानले जाते. मध्ययुगीन काळात धर्म, समाज आणि संस्कृती यांच्यातील दुरावा कमी करून लोकभाषेला अध्यात्म, तत्त्वज्ञान आणि साहित्याची अभिव्यक्ती देण्याचे अतिशय महत्त्वाचे कार्य संतांनी केले. त्यामुळे मराठी ही केवळ बोलीभाषा न राहता साहित्यमय, विचारप्रवर्तक आणि लोकमान्य भाषा बनली. मराठी भाषेचा विकास हा अनेक शतकांच्या ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रक्रियेतून घडलेला आहे. संस्कृतपासून प्राकृत आणि अपभ्रंश या टप्प्यांतून विकसित होत मराठीने स्वतंत्र भाषेचे रूप धारण केले. विशेषतः महाराष्ट्र प्राकृत आणि अपभ्रंश यांपासून मराठीची निर्मिती झाली असे भाषातज्ज्ञ मानतात. इ.स. 10 व्या - 11 व्या शतकात शिलालेख, ताम्रपट आणि प्रशासकीय कागदपत्रांत मराठीचे प्रारंभिक स्वरूप दिसते. सुरुवातीला ती लोकांची बोलीभाषा होती; परंतु पुढील काळात ती साहित्य आणि शासनकारभाराची भाषा बनली. मध्ययुगीन काळात मराठीच्या विकासाला सर्वात मोठी चालना संतपरंपरेने दिली. त्या काळात संस्कृत ही विद्वानांची भाषा होती आणि सामान्य लोकांना धार्मिक ज्ञानापासून दूर ठेवले जात होते. अशा परिस्थितीत संत ज्ञानेश्वर यांनी ‘ज्ञानेश्वरी’ या ग्रंथातून भगवद्गीतेचे तत्त्वज्ञान मराठीत मांडले आणि मराठीला ज्ञानभाषेचा दर्जा मिळवून दिला. ज्या काळात संस्कृत ही ज्ञानभाषा आणि सर्व भाषांमध्ये राज विराजित असलेली भाषा म्हणून सर्वत्र तिचा परिचय होता. अशा काळात मराठी भाषेचा केवळ विचार करणे हा अपराध मानला जायचा त्या काळात संत ज्ञानेश्वरांनी या मराठी भाषेला ज्ञान भाषेचा दर्जा मिळवून दिला. हे सगळ्यात महत्त्वाचे बंड म्हणून त्याकडे पाहिले गेले पाहिजे. आज ज्याप्रमाणे नामदेव ढसाळ यांचे नाव डोळ्यासमोर येते. तेव्हा भाषेच्या संदर्भातला त्यांचा विद्रोह समोर येतो; परंतु त्याच तोडीचा पहिला विद्रोह प्रतिकूल परिस्थिती असताना संत ज्ञानेश्वरांनी केला ही खरं सगळ्यात मोठी क्रांती होती. त्याच क्रांतीचा वारसा पुढे संत नामदेव, संत एकनाथ आणि संत तुकाराम यांनी अभंग, भारूड आणि प्रवचनांच्या माध्यमातून चालू ठेवला आणि मराठीला लोकजीवनाशी जोडले. या संतांनी साधी, गेय आणि प्रभावी भाषा वापरल्यामुळे मराठी सर्वसामान्यांची अभिव्यक्ती बनली. समर्थ रामदास यांनी ‘दासबोध’ व ‘मनाचे श्लोक’ यांतून नैतिकता, कर्तव्य आणि राष्ट्रभावना यांचा संदेश दिला, ज्यामुळे मराठी भाषेला प्रेरणादायी स्वरूप प्राप्त झाले. मराठीच्या विकासातील पुढील महत्त्वाचा टप्पा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा काळ. त्यांनी स्वराज्य स्थापनेनंतर मराठीला प्रशासनात स्थान दिले. शासनाचे आदेश, पत्रव्यवहार आणि दप्तरातील लेखन मराठीत होऊ लागले. त्यामुळे मराठीला राजकीय प्रतिष्ठा मिळाली आणि तिचा व्यावहारिक उपयोग वाढला. पेशवाईच्या काळातही मराठीचा वापर प्रशासन, न्यायव्यवस्था आणि इतिहासलेखनात झाला. बखरी, पोवाडे आणि पत्रलेखन या प्रकारांनी भाषेला ऐतिहासिक वाङ्मयाची परंपरा दिली. ब्रिटिश काळात मराठी भाषेला आधुनिकतेची दिशा मिळाली. मुद्रणयंत्राच्या आगमनामुळे पुस्तके, वृत्तपत्रे आणि मासिके प्रकाशित होऊ लागली. शिक्षणप्रणालीमध्ये मराठीचा वापर वाढला आणि व्याकरण, शब्दकोश, निबंध, कादंबरी, नाटक अशा आधुनिक साहित्यप्रकारांचा विकास झाला. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्र राज्याची स्थापना (1960) झाल्यावर मराठीला राज्यभाषेचा दर्जा मिळाला. शिक्षण, प्रशासन, साहित्य, नाटक, चित्रपट आणि माध्यमांमधून तिचा व्यापक वापर सुरू झाला. आधुनिक काळात संगणक, इंटरनेट आणि सामाजिक माध्यमांमुळे मराठी जागतिक स्तरावर पोहोचली आहे. विज्ञान, तंत्रज्ञान आणि उच्च शिक्षणातही तिचा वापर वाढत आहे. अशा प्रकारे मराठी भाषेचा विकास हा प्राचीन भाषिक परंपरा, संतसाहित्य, राजकीय आश्रय, आधुनिक शिक्षण आणि तंत्रज्ञान या सर्व घटकांच्या एकत्रित परिणामातून घडलेला आहे. लोकभाषेपासून ज्ञानभाषा आणि राजभाषेपर्यंतचा तिचा प्रवास हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाचा महत्त्वाचा भाग आहे. मराठी भाषेच्या विकासात संताचे योगदान : 1. संत ज्ञानेश्वर संत ज्ञानेश्वर यांचे मराठी भाषेच्या विकासातील योगदान अत्यंत मूलभूत आणि क्रांतिकारी मानले जाते. 13व्या शतकात संस्कृत हीच ज्ञान आणि धर्माची प्रमुख भाषा होती, त्यामुळे सामान्य लोकांना धार्मिक ग्रंथ समजत नव्हते. अशा वेळी ज्ञानेश्वरांनी लोकभाषा असलेल्या मराठीतून अध्यात्म आणि तत्त्वज्ञान मांडण्याचे धाडस केले. त्यांनी भगवद्गीतेचा अर्थ मराठीत सांगणारा ‘भावार्थदीपिका’ किंवा ‘ज्ञानेश्वरी’ हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामुळे प्रथमच उच्च तत्त्वज्ञान सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचले आणि मराठीला ज्ञानभाषेचा दर्जा प्राप्त झाला.

“माझी मराठी भाषा चोखडी । परब्रह्मे फळली मोठी ॥” ज्ञानेश्वर मराठी भाषेचा अभिमान व्यक्त करतात. ‘चोखडी’ म्हणजे शुद्ध, पवित्र. मराठी भाषा इतकी समर्थ आहे की ती परब्रह्माचे (ईश्वराचे) ज्ञान व्यक्त करू शकते. म्हणजेच मराठी ही केवळ व्यवहाराची भाषा नसून अध्यात्म आणि तत्त्वज्ञान मांडण्यास सक्षम आहे. "दाऊ वेल्हाळे देशी नवी । जे साहित्याते वोजावी । अमृतातेही चुकी ठेवी ।

गोडसपणे" (अ.13, ओवी 1152) ज्ञानेश्वरांना मराठी भाषेचा सार्थ अभिमान आहे. साहित्याला तेजःपुंज करणारी सुंदर नवीन देशी भाषा व्यक्त करू, जी अमृतालाही मागे सारील. ज्ञानेश्वरांनी ओवी छंदात, सोप्या आणि रसाळ भाषेत गीतेचे तत्त्वज्ञान स्पष्ट केले, त्यामुळे मराठीची अभिव्यक्तीक्षमता वाढली आणि ती गंभीर विषय मांडण्यास सक्षम ठरली. ज्ञानेश्वरांनी आपल्या लेखनात ग्रामीण जीवनातील उदाहरणे, उपमा, रूपके आणि लोकप्रचलित शब्दांचा वापर केला. त्यामुळे मराठी भाषा लोकांच्या दैनंदिन जीवनाशी अधिक जवळची झाली. त्यांनी ‘अमृतानुभव’ या ग्रंथातून शुद्ध तत्त्वज्ञान मांडून मराठी भाषा उच्च दर्जाचे चिंतन व्यक्त करू शकते हे सिद्ध केले. "हां हो नवल नोहे देशी । मऱ्हाटी बोलिजे तरि ऐसी । वाणें उमटत आहे मा आकाशीं । साहित्यारंगाचे ।।" (अ.6 ओवी 133) संत ज्ञानेश्वर म्हणतात, हे काही आश्चर्यकारक नाही की मी मराठीत बोलतो. मराठी भाषेतही इतकी सामर्थ्यशाली, सुंदर आणि रसपूर्ण अभिव्यक्ती होऊ शकते की, तिचा नाद जणू आकाशात घुमत आहे आणि साहित्याचा रंग सर्वत्र पसरत आहे. त्यांच्या या लेखनामुळे मराठीची शब्दसंपत्ती, शैली आणि माधुर्य मोठ्या प्रमाणात वाढले. मराठी भाषा केवळ बोलीभाषा न राहता साहित्यभाषा बनण्याची प्रक्रिया याच काळात सुरू झाली.

ज्ञानेश्वरांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे संतपरंपरेची निर्मिती. त्यांच्या प्रेरणेने पुढे नामदेव, एकनाथ, तुकाराम यांसारख्या संतांनी मराठीत विपुल साहित्य निर्माण केले. त्यामुळे मराठी भाषेचा सातत्याने विकास झाला आणि ती महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीचे प्रमुख माध्यम बनली. अशा प्रकारे संत ज्ञानेश्वरांनी मराठीला लोकभाषेपासून ज्ञानभाषेकडे नेले, तिला तत्त्वज्ञान आणि काव्याची समृद्ध परंपरा दिली आणि मराठी भाषेच्या विकासाचा मजबूत पाया घातला. त्यामुळे मराठी भाषेच्या इतिहासात त्यांचे स्थान अद्वितीय आणि सर्वोच्च मानले जाते. 2. संत नामदेवांचे योगदान संत नामदेव यांनी अभंगांच्या माध्यमातून भक्ती आणि समाजजागृती केली. त्यांच्या रचनांमध्ये साधी, सरळ आणि भावपूर्ण मराठी आढळते. नामदेवांनी मराठीला लोककाव्याची परंपरा दिली आणि अभंग हा प्रकार लोकप्रिय केला. संत नामदेव हे वारकरी संप्रदायातील प्रमुख संतकवी असून मराठी भाषेच्या विकासात त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांनी मराठी भाषेत अभंगरचना करून भक्तीभाव, अध्यात्म आणि लोकजीवन यांची सुंदर अभिव्यक्ती केली. त्या काळात धार्मिक व तत्त्वज्ञानपर साहित्य मुख्यतः संस्कृतमध्ये होते आणि सामान्य लोकांना ते समजणे कठीण होते; परंतु नामदेवांनी साध्या, सरळ आणि बोलभाषेतील मराठीत अभंग लिहिले. त्यामुळे मराठी भाषा लोकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडली गेली आणि सामान्य जनतेपर्यंत धर्म व अध्यात्म पोहोचले. त्यांच्या अभंगांमध्ये ग्रामीण जीवन, व्यवहारातील शब्द, लोकसंस्कृती आणि समाजजीवनाचे प्रतिबिंब दिसते, त्यामुळे मराठी भाषेची शब्दसंपत्ती आणि अभिव्यक्ती अधिक समृद्ध झाली. नामदेव हे कीर्तनकार असल्यामुळे त्यांनी कीर्तनपरंपरेद्वारे मराठी भाषेचा मोठ्या प्रमाणावर प्रसार केला. कीर्तन, प्रवचन आणि भजन यांच्या माध्यमातून निरक्षर लोकांनाही मराठी साहित्य ऐकता व समजता आले. त्यांनी विठ्ठलभक्तीचा संदेश लोकभाषेत दिला, त्यामुळे मराठी ही भक्तीभाव व्यक्त करण्याची प्रमुख भाषा बनली. नामदेवांनी उत्तर भारतातही प्रवास करून आपली भक्तीपरंपरा पसरवली. त्यांच्या काही रचना शीख धर्माच्या पवित्र ग्रंथात म्हणजेच 'गुरुग्रंथसाहिब' मध्ये समाविष्ट आहेत, यावरून त्यांच्या कार्याचा व्यापक प्रभाव दिसून येतो. त्यांच्या कार्यामुळे मराठी संतसाहित्याची परंपरा दृढ झाली आणि पुढे संत एकनाथ व संत तुकाराम यांसारख्या संतकवींना प्रेरणा मिळाली. अशा पद्धतीने संत नामदेवांनी मराठी भाषेला लोकभाषेचा दर्जा, साहित्यिक समृद्धी आणि धार्मिक-आध्यात्मिक अभिव्यक्तीचे सामर्थ्य प्राप्त करून दिले. त्यांच्या कार्यामुळे मराठी भाषा जनमानसात रुजली आणि संतसाहित्याच्या माध्यमातून तिचा सर्वदूर प्रसार झाला. म्हणून मराठी भाषेच्या विकासात संत नामदेव यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते. 3. संत एकनाथांचे योगदान संत एकनाथ यांनी मराठी भाषेला विद्वत्तेची जोड दिली. एकनाथी भागवत, भावार्थ रामायण यांसारखे ग्रंथ, भारूड या लोकाभिमुख प्रकाराची निर्मिती केली. संत एकनाथ हे मराठी संतसाहित्यातील अत्यंत महत्त्वाचे संतकवी असून मराठी भाषेच्या विकासात त्यांचे योगदान मोलाचे आहे. त्यांनी मराठीला केवळ भक्तीभाव व्यक्त करण्याचे माध्यम न ठेवता तत्त्वज्ञान, नैतिकता, समाजप्रबोधन आणि लोकजीवन व्यक्त करणारी समर्थ भाषा बनवली. त्या काळात संस्कृत ही विद्वानांची भाषा मानली जात होती; परंतु एकनाथांनी सामान्य लोकांना समजेल अशा साध्या, ओघवत्या मराठी भाषेत ग्रंथरचना केली. त्यांच्या 'एकनाथी भागवत' या ग्रंथातून भागवत धर्मातील तत्त्वज्ञान मराठीत मांडले गेले, त्यामुळे मराठी भाषेला धार्मिक व तात्त्विक विषय मांडण्याची ताकद प्राप्त झाली. तसेच 'भावार्थ रामायण' या ग्रंथाद्वारे रामकथेचा भावार्थ मराठीत सांगून त्यांनी लोकभाषेचा सन्मान वाढवला. संत एकनाथांनी अभंग, भारूड, ओवी, गवळणी इत्यादी विविध काव्यप्रकारांतून लेखन केले. विशेषतः भारूडांमधून त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद, ढोंगीपणा यांवर प्रहार करून लोकजागृती केली. त्यांच्या रचनांमध्ये लोकजीवनातील शब्द, म्हणी, बोलीभाषेचा वापर मोठ्या प्रमाणावर दिसतो, त्यामुळे मराठी भाषेची अभिव्यक्ती अधिक समृद्ध झाली. कीर्तनपरंपरेद्वारे त्यांनी मराठी भाषेचा प्रसार केला आणि निरक्षर लोकांनाही साहित्याचा आनंद मिळवून दिला. त्यांच्या अभंगांमध्ये भक्ती, समता, मानवता आणि नैतिक मूल्ये यांचे सुंदर दर्शन घडते.

“माझे माहेर पंढरी, आहे भीवरेच्या तीरी । बाप आणि आई, माझी विठ्ठल रखुमाई ॥” या अभंगातून एकनाथांनी विठ्ठलभक्ती अत्यंत भावपूर्ण आणि साध्या मराठीत व्यक्त केली आहे. ‘पंढरपूर’ हे माहेर मानून भक्त आणि देव यांचे जिव्हाळ्याचे नाते त्यांनी दाखवले आहे. अशा प्रकारच्या अभंगांमुळे मराठी भाषा लोकांच्या भावना व्यक्त करणारी, आत्मीय आणि जिवंत भाषा बनली. “संस्कृत वाणी देवे केली । प्राकृत काय चोरापासोनी आली ॥ अशी गर्वाची गोष्ट न बोलावी । सर्व भाषांमध्ये ईश्वर वसे ॥” संस्कृत ही देवाची भाषा आहे असे मानले जाते, पण प्राकृत (लोकभाषा/मराठी) काही चोरांकडून आलेली नाही. कोणतीही भाषा कमी लेखू नये, कारण सर्व भाषांमध्ये ईश्वराचा वास असतो. अशा रीतीने संत एकनाथांनी मराठी भाषेला साहित्यिक समृद्धी, तात्त्विक गहनता आणि लोकाभिमुखता दिली. त्यांच्या ग्रंथरचना, अभंग, भारूड आणि कीर्तनपरंपरेमुळे मराठी भाषा जनसामान्यांमध्ये रुजली आणि अधिक प्रगल्भ झाली. म्हणून मराठी भाषेच्या विकासात संत एकनाथ यांचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते

5. संत तुकारामांचे योगदान संत तुकाराम हे मराठी संतसाहित्यातील श्रेष्ठ संतकवी असून मराठी भाषेच्या विकासात त्यांचे योगदान अत्यंत मोठे आहे. त्यांनी आपल्या अभंगांद्वारे मराठी भाषेला लोकमानसात खोलवर रुजवले आणि तिला भक्ती, तत्त्वज्ञान, समाजप्रबोधन व नैतिक मूल्ये व्यक्त करणारी प्रभावी भाषा बनवले. तुकारामांच्या काळात संस्कृत ही विद्वानांची भाषा मानली जात होती; परंतु त्यांनी सर्वसामान्यांना समजेल अशा साध्या, ओघवत्या आणि जिवंत मराठीत अभंगरचना केली. “वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा । इतरांनी वाहावा भार माथा ॥” या ओवीत तुकाराम म्हणतात की, वेदांचे खरे तत्त्वज्ञान आम्हाला समजले आहे; फक्त संस्कृत जाणणाऱ्यांनाच ज्ञान असते असे नाही. लोकभाषेतूनही अध्यात्म समजू शकते. त्यामुळे मराठी भाषा सामान्य लोकांच्या भावना, दुःख-आनंद, श्रद्धा आणि जीवनानुभव व्यक्त करणारे समर्थ माध्यम ठरली. तुकारामांनी सुमारे चार हजारांहून अधिक अभंग रचले. त्यांच्या अभंगांमध्ये ग्रामीण जीवन, व्यवहारातील शब्द, म्हणी, उपमा आणि लोकसंस्कृती यांचा मोठ्या प्रमाणावर वापर आढळतो. “आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्न करू ॥ शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्द वाटू धन जनलोका ॥” या अभंगात तुकाराम म्हणतात, आमच्या घरी खरे धन म्हणजे शब्दांची रत्ने (भाषेची संपत्ती) आहे. शब्द हेच आमचे शस्त्र आणि जीवन आहे. आम्ही हे शब्दरूपी धन लोकांमध्ये वाटतो. म्हणून मराठी भाषेची शब्दसंपत्ती आणि अभिव्यक्ती अधिक समृद्ध झाली. त्यांनी अंधश्रद्धा, जातिभेद, ढोंगीपणा आणि सामाजिक अन्याय यांवर टीका करून समाजजागृती केली. कीर्तन व भजनपरंपरेद्वारे त्यांच्या अभंगांचा प्रसार झाला आणि निरक्षर लोकांनाही मराठी साहित्याचा आनंद घेता आला. त्यांच्या रचनांमुळे मराठी ही केवळ बोलीभाषा न राहता उच्च दर्जाचे साहित्य निर्माण करणारी समर्थ भाषा म्हणून प्रतिष्ठित झाली. “वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे । पक्षीही सुस्वरें आळविती ॥ येणे सुखे रुचे एकांताचा वास । नाही गुणदोष अंगा येत ॥” या अभंगातून तुकारामांनी निसर्गाशी असलेले आत्मीय नाते अत्यंत साध्या आणि सुंदर मराठीत व्यक्त केले आहे. त्यांच्या भाषेत कृत्रिमता नसून जिवंतपणा, भावनिकता आणि सहजता आहे. त्यामुळे मराठी भाषा लोकांच्या मनातील भावना थेट व्यक्त करणारी भाषा बनली. अशा प्रकारे संत तुकारामांनी आपल्या अभंगरचनेतून मराठी भाषेला व्यापक लोकमान्यता, साहित्यिक समृद्धी आणि आध्यात्मिक गहनता दिली. त्यांच्या कार्यामुळे मराठी भाषा जनसामान्यांची, भक्तीची आणि समाजप्रबोधनाची प्रभावी भाषा म्हणून विकसित झाली. म्हणून मराठी भाषेच्या विकासात संत तुकाराम यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते. 5. संत रामदासांचे योगदान संत रामदास हे मराठी संतसाहित्यातील प्रभावी संतकवी व विचारवंत असून मराठी भाषेच्या विकासात त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी मराठी भाषेतून धर्म, नैतिकता, राष्ट्रप्रेम, कर्तव्यभाव आणि समाजसंघटन यांचा संदेश दिला. त्यांच्या काळात लोकांना समजेल अशा भाषेत मार्गदर्शनाची गरज होती; ती गरज समर्थांनी ओघवत्या, प्रभावी आणि प्रबोधनपर मराठीत लेखन करून पूर्ण केली. त्यामुळे मराठी भाषा केवळ भक्तीची नव्हे तर व्यवहार, नीती आणि समाजजीवन घडविणारी समर्थ भाषा बनली. समर्थ रामदासांचे 'दासबोध' हे ग्रंथराज मराठी गद्य-पद्य परंपरेतील अत्यंत महत्त्वाचे कार्य मानले जाते. या ग्रंथातून त्यांनी अध्यात्म, व्यवहारज्ञान, राजकारण, समाजनीती आणि आत्मविकास यांचे मार्गदर्शन मराठीत केले. तसेच मनाचे श्लोक या रचनांमधून त्यांनी मनाला सद्गुण, संयम, पराक्रम आणि सदाचार यांची शिकवण दिली. त्यांच्या लिखाणामुळे मराठी भाषेला ओज, प्रभाव आणि उपदेशात्मक सामर्थ्य प्राप्त झाले. त्यांनी कीर्तन, प्रवचन आणि मठसंस्थांद्वारे मराठी भाषेचा व्यापक प्रसार केला. समर्थांच्या रचनांमध्ये साधी, स्पष्ट, प्रेरणादायी आणि ओजस्वी भाषा दिसते. त्यांनी लोकांना कर्तव्य, शौर्य, संघटन आणि स्वधर्म यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या साहित्यामुळे मराठी भाषा समाजजागृती व राष्ट्रचेतना निर्माण करणारे प्रभावी माध्यम ठरली. “मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धीचे कारण ॥ मोक्ष अथवा बंधन । सुख समाधान इच्छा ते ॥” या ओवीत समर्थ रामदास मनशुद्धी आणि सकारात्मकतेचा संदेश देतात. अत्यंत सोप्या मराठीत त्यांनी जीवनाचे तत्त्वज्ञान सांगितले आहे. त्यांच्या अशा रचनांमुळे मराठी भाषा विचार, उपदेश आणि आत्मचिंतन व्यक्त करणारी परिपक्व भाषा बनली. अशा प्रकारे संत रामदासांनी आपल्या ग्रंथरचना, ओव्या, उपदेश आणि प्रबोधनपरंपरेद्वारे मराठी भाषेला ओजस्वी आणि व्यवहारक्षम रूप दिले. त्यांच्या कार्यामुळे मराठी भाषा समाजजीवन घडविणारी, नैतिक मूल्ये रुजविणारी आणि जनमानसाला प्रेरणा देणारी समर्थ भाषा म्हणून विकसित झाली. म्हणून मराठी भाषेच्या विकासात संत रामदास यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते. 6. इतर संतांचे योगदान मराठी संतसाहित्यात अनेक संतांनी आपल्या रचनांद्वारे मराठी भाषेचा विकास घडवून आणला. संत जनाबाई, संत चोखामेळा, संत नरहरी सोनार, संत सावता माळी तसेच इतर संतांनी अभंग, ओवी आणि कीर्तनपरंपरेतून मराठी भाषेला लोकभाषा म्हणून प्रतिष्ठा दिली. त्यांच्या रचनांमुळे मराठी भाषा सामान्य लोकांच्या भावना, भक्ती, दुःख-आनंद आणि समाजजीवन व्यक्त करणारे प्रभावी माध्यम बनली. संत जनाबाई यांनी अत्यंत साध्या, घरगुती आणि स्त्रीजीवनाशी निगडित भाषेत अभंग लिहिले. त्यांनी दैनंदिन कामे, कष्टमय जीवन आणि विठ्ठलभक्ती यांचे सुंदर चित्रण केले. त्यामुळे मराठी भाषेत स्त्रीअनुभव, श्रमजीवन आणि आत्मीयता व्यक्त झाली. त्यांच्या रचनांमुळे मराठी भाषा घराघरांत पोहोचली. संत चोखामेळा यांनी समाजातील अस्पृश्यता, अन्याय आणि दुःख यांचे हृदयस्पर्शी चित्रण मराठीत केले. त्यांच्या अभंगांमध्ये दलित समाजाचे जीवन आणि वेदना व्यक्त झाल्या. त्यामुळे मराठी भाषेला सामाजिक वास्तव आणि समतेचा संदेश देणारे स्वरूप मिळाले. त्यांनी मराठीला वंचितांच्या भावनांचेही माध्यम बनवले. संत नरहरी सोनार यांनी आपल्या व्यवसायाशी संबंधित प्रतिमा, रूपके आणि व्यवहारातील शब्द वापरून अभंग रचले. त्यांच्या रचनांमुळे मराठी भाषेत कारागीर व श्रमिक जीवनाचे प्रतिबिंब दिसते. त्यांनी भक्तीभाव अत्यंत साध्या आणि प्रांजळ भाषेत व्यक्त केला. संत सावता माळी यांनी शेतकरी जीवन, श्रमसंस्कृती आणि निसर्गाशी असलेले नाते अभंगांमधून मांडले. त्यामुळे मराठी भाषेत ग्रामीण जीवनाचे जिवंत चित्र उमटले. त्यांच्या रचनांमुळे मराठी ही शेतकरी व कष्टकरी समाजाची भाषा म्हणून अधिक दृढ झाली. या सर्व संतांनी कीर्तन, भजन आणि वारकरी परंपरेतून आपल्या रचनांचा प्रसार केला. त्यामुळे निरक्षर लोकांनाही मराठी साहित्य ऐकता व समजून घेता आले. त्यांनी संस्कृतऐवजी लोकभाषेचा वापर करून मराठीला धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अभिव्यक्तीचे सामर्थ्य दिले. त्यांच्या योगदानामुळे मराठी भाषा जनमानसात रुजली, समृद्ध झाली आणि संतसाहित्याची भव्य परंपरा निर्माण झाली. अशा प्रकारे या संतांनी मराठी भाषेला लोकभाषेचा दर्जा, साहित्यिक समृद्धी आणि समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम बनवले. म्हणून मराठी भाषेच्या विकासात या सर्व संतांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते. 7. संतपरंपरेमुळे झालेला भाषाविकास संतांनी अभंग, ओवी, भारूड, कीर्तन आणि भजन यांच्या माध्यमातून साहित्यनिर्मिती केली. या श्रवणपरंपरेमुळे निरक्षर लोकांनाही मराठी भाषा आणि साहित्य समजू लागले. त्यांच्या रचनांमध्ये लोकजीवन, ग्रामीण संस्कृती, स्त्री-पुरुषांचे अनुभव, शेतकरी व कष्टकरी समाजाचे जीवन यांचे चित्रण आढळते. त्यामुळे मराठी भाषेची शब्दसंपत्ती, अभिव्यक्ती आणि लोकाभिमुखता वाढली. संतपरंपरेमुळे मराठी ही केवळ बोलीभाषा न राहता भक्ती, तत्त्वज्ञान, समाजजागृती आणि नैतिक मूल्ये व्यक्त करणारी समृद्ध साहित्यभाषा बनली. अशा प्रकारे संतांच्या कार्यामुळे मराठी भाषा जनमानसात रुजली, सर्वसमावेशक झाली आणि तिचा सर्वांगीण विकास घडून आला. मराठी भाषेच्या विकासात संतपरंपरेचे योगदान अमूल्य आहे. संतांनी मराठीला केवळ अभिव्यक्तीचे साधन न ठेवता ती लोकजीवन, अध्यात्म, समाजसुधारणा आणि संस्कृती यांची वाहक बनवली. त्यांच्या कार्यामुळे मराठी भाषा आज समृद्ध, सक्षम आणि व्यापक झाली आहे. त्यामुळे संतपरंपरा ही मराठी भाषेच्या इतिहासातील सुवर्णयुग मानली जाते.

समारोप खरे तर असे म्हणावे लागेल की मराठी भाषा ही एकमेव अशी भाषा आहे ज्या भाषेत एवढी मोठी संतांची दीर्घ परंपरा आहे. मराठी भाषेत ही संत परंपरा जन्माला आली, त्यांनी आपल्या अभिव्यक्तीचे माध्यम म्हणून मराठी भाषेची निवड केली. तीला ज्ञान भाषेचा दर्जा मिळावा यासाठी संपूर्ण आयुष्य खर्ची घातले यापेक्षा मोठे योगदान मराठी भाषेच्या विकासात असूच शकत नाही. म्हणून महाराष्ट्रातील संतपरंपरेमुळे मराठी भाषेचा अभूतपूर्व विकास झाला, हे त्रिकालाबाधित सत्य आहे. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत रामदास आणि इतर संतांनी लोकभाषेतून अध्यात्म, तत्त्वज्ञान, नैतिकता व समाजप्रबोधन मांडले. त्यामुळे मराठी भाषा सामान्य लोकांची, भक्तीची आणि ज्ञानाची प्रभावी भाषा बनली. संतांच्या अभंग, ओवी, भारूड आणि कीर्तनपरंपरेमुळे मराठी भाषा घराघरांत पोहोचली, समृद्ध झाली आणि सर्व समाजघटकांना जोडणारी ठरली. त्यांनी भाषेतील साधेपणा, भावपूर्णता आणि लोकजीवनाशी असलेले नाते जपले, म्हणून मराठी भाषेला साहित्यिक वैभव आणि सांस्कृतिक अधिष्ठान प्राप्त झाले, असे ठामपणे म्हणता येते.



लेखक : बापूराव वऱ्हाडे